# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पोस्टे सोनखेड जि नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | पोस्टे सोनखेड गुरनं 270/2025 कलम 7 भ्रप्रअ 1988 |
| 4 | तक्रारदार | पुरूष, वय 30 वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | गणपत नागोराव गिते, वय 50 वर्षे, पद सहायक पोलीस उप निरीक्षक, ब.न. 5283 नेमणुक पोलीस स्टेशन सोनखेड ता. लोहा जि. नांदेड रा. कल्याण अपार्टमेंट सिकडो रोड, नांदेड (गट क) |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक 25/11/2025 रोजी वेळ 11.54 ते 14.35 वाजता चे दरम्याण शेवडी बिट चे ईमारती मध्ये पोस्टे सोनखेड ता. लोहा |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक 25/11/2025 रोजी 19.34 वाजता |
| 8 | मागणी केलेली रक्कम | 10,000/- रूपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | 5,000/- रूपये |
| 10 | **थोडक्यात माहिती** – दिनांक 24/11/2025 रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार यांचे वडिलांचे नावे जवळा ता. लोहा जि. नांदेड येथे 20 गुंठे शेतजमीन आहे. दिनांक 13/11/2025 रोजी त्या शेतात शेत शेजाऱ्यानी प्रवेश करुन शेतात लावलेली तुर उपटुन टाकली आणि त्याठिकाणी ज्वारी पेरणी करु लागले. त्यावेळी तक्रारदार यांचा भाऊ व वडील हे शेतात गेले असता त्यांच्यामध्ये वाद होऊन मारामारी झाली. त्याबाबत दिनांक 17/11/2025 रोजी पोलीस स्टेशन सोनखेड येथे तक्रारदार यानी दिलेल्या फिर्याद वरुन त्यांचे शेत शेजाऱ्यावर गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयांचा तपास सहायक पोलीस उप निरीक्षक गणपत गिते हे करीत आहेत.तसेच विरोधी पार्टी यांचे तक्रारी वरुन तक्रारदार, त्यांचे वडील व भावावर पोलीस स्टेशन सोनखेड येथे एन.सी.दाखल आहे. सहायक पोलीस उप निरीक्षक गिते यांनी तक्रारदार यांना गुन्हयांत मदत करण्यासाठी व विरोधकावर कार्यवाही करण्यासाठी 20,000/-रुपयांची मागणी केली होती. त्यावेळी नाईजास्तव तडजोडी अंती तक्रारदार यांनी त्यांना 10,000/- रुपये दिले होते. दिनांक 20/11/2025 रोजी सहायक पोलीस उप निरीक्षक गणपत गिते यांनी तक्रारदार यांना पोलीस स्टेशन सोनखेड येथे कार्यवाहीचे निमित्ताने बोलावून तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीवरुन विरोधातील लोकांवर कारवाई करण्यासाठी तसेच तक्रारदारावर दाखल एन.सी. मध्ये मदत करण्यांसाठी आणखीन 10,000/- रुपये दे, असे म्हणुन त्यांच्याकडे पैशाची मागणी केली होती.<br>दिनांक 25/11/2025 रोजी पोलीस स्टेशन सोनखेड येथे तक्रारदार यांनी दाखल केलेल्या गुन्हयांतील लोकांवर कारवाई करण्यासाठी तसेच तक्रारदार यांना मदत करण्यासाठी शासकीय पंचासमक्ष 10,000/-रुपये लाचेची स्वतः मागणी करुन तडजोडी अंती 5,000/-रुपये स्वीकारण्यास सहमती दिल्याने पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे.<br>दिनांक 25/11/2025 रोजी आरोपी लोकसेवक यांनी पोलीस स्टेशन सोनखेड येथे तक्रारदार यांचेकडुन 5,000/-रुपये लाच रक्कम स्वतः स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल | |

सदरची सापळा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस निरीक्षक श्री. करीमखान पठाण, श्रीमती प्रिती जाधव, ASI/रसुल शेख, पोहेका/305 अरशद अहेमद खान, पोकॉ/186 सय्यद खदीर, पोकॉ/3199 शिवानंद रापतवार चापोहेकॉ/2922 गजानन राऊत यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील कमांकावर संपर्क करावा.

**१) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक** – ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९
**२) श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक** – ०२४६२ – २५५८११
**३) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** – मो.नं. ९३५९०५६८४०.
**४) टोल फ्रि** – १०६४
**५) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी क्रमांक** – ०२४६२ – २५३५१२
**६) Website** – www.acbmaharashtra.gov.in
**७) Mobile App** – www.acbmaharashtra.net
**८) Facebook Page** – www.facebook.com/maharashtraACB
**९) Twitter** – @ACBnanded
**१०) Instagram** – acb_nanded
**११) Youtube Cahnnel** – @AntiCorruptionBureauNanded

कार्यालय,पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग,नांदेड परिक्षेत्र

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड